# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २०.०९.२०२१

**मानवी जिवीतास हानीकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला विमल पानमसाला व तंबाखु (सुगंधीत), एक देशी बनावटीचे पिस्तुल, वाहने, रोख रक्कम असा सुमारे ७९,००,८८०/— रू. किमंतीचा मुद्देमालासह पाच आरोपी जेरबंद, गुन्हे शाखा नवी मुंबई यांची कारवाई.**

---

मा. पोलीस आयुक्त, पोलीस सह आयुक्त व अप्पर पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे '' नशा मुक्त नवी मुंबई'' या विशेष मोहिम अभियाना अंतर्गत कारवाई सुरु आहे. त्या अनुषंगाने दिनांक १७/०९/२०२१ रोजी गुन्हे शाखेचे वपोनि कोल्हटकर यांना मिळालेल्या बातमीवरून, सेक्टर ३० ए, ओरीसा भवन, वाशी नवी मुंबई परिसरात करण व त्याचे साथीदार हे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला पानमसाला व तंबाखु (सुगंधीत) मालाची अवैद्यरित्या विक्री करण्यासाठी आणुन तेथे दुसऱ्या वाहनां मधून वितरीत करणार आहेत. बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठांचे सुचने प्रमाणे दिनांक १७/०९/२०२१ रोजी पहाटेचे सुमारास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एन.बी.कोल्हटकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने सापळा रचून कारवाई केली, ओरीसा भवन समोरील निर्जण रोडवर एका आयशर टेम्पो मधुन बोलेरो पिकअप जिपमध्ये काही इसम गोण्यामधे असलेला विमल पानमसाला व वी—१ सुगंधीत तंबाखू भरत असतांना पोलीस पथकाने त्यांना ताब्यात घेण्यासाठी घेराव घातला असता तेथील इसमांनी पोलीसांशी झटापट केली तसेच एक इसम पळुन जात असतांना शिताफिने त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यादरम्यान तेथील पोलीसांचे अभिलेखावरील सराईत आरोपी करण राम साळुंके याने त्याचेकडील अग्निशस्त्र पोलीसांवर रोखुन धाक दाखवुन जिवेठार मारण्यचा प्रयत्न करत, कायदेशिर कारवाईस अडथळा निर्माण करुन सदर ठिकाणाहुन अंधार व गोंधळाचा फायदा घेवुन पळुन गेला.

सदर ठिकाणाहुन कारवाई दरम्यान आयशर टेम्पो, बोलेरो पिकअप जिप, फॉच्युनर कार या वाहनांमध्ये २७,९३,८८०/— रू. किमंतीचा मानवी जिवीतास हानीकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला वेगवेगळया प्रकाराचा पानमसाला व तंबाखु (सुगंधीत) असा मालाचा साठा व त्यासाठी वापरण्यात आलेली वाहने, फॉरच्युनर कारमध्ये मिळुन आलेली रोख रक्कम, एक देशी बनावटीचे पिस्तुल, मोबाईल फोन व इतर **सुमारे ७९,००,८८०/— रू. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला** असुन याबाबत वाशी पोलीस ठाणे गु.र.नं. ३२३/2021 भा.द.वि. कलम ३०७, ३५३, १८८, २७२, २७३, ३२८, ३४ सह अन्नसुरक्षा कायदा कलम २६(२)(I), २६(२)(IV), २७(३)(D), २७(३)(E) भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१), (३)/ १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. प्रस्तुत गुन्हयात ०५ आरोपींना दि.

१८/०९/२०२१ रोजी ०१.३४ वा. अटक करण्यात आली असुन दि. २३/०९/२०२१ रोजी पावेतो पोलीस कस्टडी

<u>अटक आरोपींची नावे :—</u>

**१. अजयकुमार सुरज गौंड, वय ३३ वर्षे धंदा ड्रायव्हर, रा. फळ मार्केट, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई, मुळ राहणार, सलाहाबाद, सरकारी आवास, ता.जि. महु, राज्य उत्तरप्रदेश**

**२. गोविंद वामन बोडारे, वय ४४ वर्षे, धंदा ड्रायव्हर, मु.पो. ओझर मिग, ता. ओझर, जि. नाशिक**

**३. घेवाराम कान्हाराम देवाशी, वय ३१ वर्षे, धंदा किराणादुकान, राह. धनअळी अपार्टमेंट, शॉपनंबर १, लक्ष किराणा स्टोअर, सेक्टर ३६, करावेगाव, नवी मुंबई**

**४. अक्षय मुरली गायकवाड, वय २१ वर्षे, धंदा हमाली, राह. मानखुर्द, महाराष्ट्र नगर, गणेश मैदानाजवळ, शिवाजीनगर, मुंबई, मु.पो. गवर, ता. बसव कल्याण, जि. बिदर, राज्य कर्नाटक**

**५. राहुलकुमार मुन्नाप्रसाद कुमार, वय २६ वर्षे, धंदाहमाली, राह. लंगडपुर, पो. महाराजगंज, ता.जि. गाजीपुर, राज्य उत्तरप्रदेश**

**<u>पाहिजे आरोपी:—</u>करण राम साळुंके, रा—फ्लॅटनं. ४०४, मंगलमुर्तीबिल्डींग, जुहुगांव, वाशी, नवीमुंबई.**

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी करण राम साळुंके हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) तुर्भे एम.आय.डी.सी. पो.स्टे. गु.र.नं. ९२/२०१८ भा.द.वि.क. ३९४,३४ प्रमाणे

२) एन.आर.आय. पो.स्टे. गु.र.नं. १६५/२०२१ भादविसं कलम १८८,२७२,२७३, ३२८ सह अन्न व सुरक्षा

मानदे कायदा २००६ चे कलम २६,२७ या गुन्हयात पाहिजे आरोपी आहे.

**<u>अटक आरोपी क्र. ३</u>** घेवाराम कान्हाराम देवाशी याचे विरुध्द एन.आर.आय. पो.स्टे. गु.र.नं. १६५/२०२१ भादविसंक १८८,२७२,२७३, ३२८ सह अन्न व सुरक्षा मानदे कायदा २००६ चे कलम २६,२७ प्रमाणे गुन्हा दाखल असुन या गुन्हयात पाहिजे आरोपी आहे.

आरोपीतांनी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला पानमसाला व तंबाखु (सुगंधीत), अग्निशस्त्र ह बेकायदेशिररित्या कोठुन आणला व तो कोठे विक्री करणार होते. या अवैध व्यवसायामध्ये आंतरराज्य टोळीसक्रिय असुन त्या अनुषंगाने इतर साथीदारांचा शोध घेवुन कारवाई करणेबाबत अधिक तपास सुरु आहे.

सदरची उल्लेखनिय कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. बिपिनकुमार सिंग, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त, श्री. प्रविणकुमार पाटील, सहायक पोलीस आयुक्त, श्री. विनोद चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. एन. बी. कोल्हटकर, पोउपनि नितीन मुदगुन, धनराज केदार,शेखर तायडे, पोलीस अमंलदार ज्ञानेश्वर सांगळे, उत्तम तरकशे, हनुमंत दळवी, सतीश भोसले, पोपट जगदाळे, महेंद्र म्हात्रे, भास्कर कुंभार,राजेश सोनावणे, संदिप कोळी, विकास म्हसकर, उदय म्हात्रे, आर.कोडी, सुभे, पवार, एस.पी.फुलकर, रविंद्र सानप यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास व.पो.नि.एन. बी. कोल्हटकर हे करीत आहेत.

★★★★★★★★★★

## मोटार वाहन चोरी शोध कक्ष, गुन्हे शाखा

**वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर-३२३/२०२१, भादवि कलम ३०७, ३५३, १८८, २७२, २७३, ३२८,३४ सह अन्न सुरक्षा कायदा कलम २६(२)(I),२६(२)(IV), २७(३)(D), २७(३)(E) भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१),(३) १३५**

..........................................................................................

- मा. पोलीस आयुक्त व अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, नवी मुंबई यांनी ''नशा मुक्त नवी मुंबई'' हे विशेष अभियान सुरु केले आहे. त्या अंतर्गत विशेष मोहिम राबवुन अमली पदार्थ व प्रतिबंधित पदार्थ यांचे विरोधात गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचेकडुन मोठया प्रमाणात कारवाई सुरु आहे.

- मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शना प्रमाणे प्राप्त गोपनिय माहितीवरुन ओडिसा भवन, वाशी, नवी मुंबई येथे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला विमल पान मसाला व वी-१ तंबाखु (सुगंधित) अवैधरित्या विक्री करीता आणलेला सुमारे २९,९३,८८० रु. किमंतीचा माल कारवाई करुन हस्तगत करण्यात आला आहे

- घटनास्थळी अवैध माल वाहतुक करणेकरिता वापरण्यात आलेला एक आयशर टेम्पो, बोलेरो पिकअप व फॉर्च्युनर कार जप्त करण्यात आले आहे.

- जप्त फॉर्च्युनर कारमधुन एक देशी बनावटीचे पिस्तुल, रोख रक्कम, मोबाईल व इतर हस्तगत करण्यात आले आहे.

- विमल पान मसाला, वी-१ तंबाखु सुगंधीत, वाहने, देशी बनावटीचे पिस्टल इ.
  एकुण हस्तगत मुददेमाल सुमारे ७९,००,८८०/- रू.

- घटनास्थळावरुन ०५ आरोपींना अटक करण्यात आले असुन नवीमुंबई आयुक्तालयातील पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार करण राम साळुंके याने त्याचेकडील अग्नीशस्त्र पोलीसांवर रोखुन धाक दाखवुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करत अंधाराचा व गोंधळाचा फायदा घेवुन पळुन गेला.

- आरोपीतींचे ताब्यात मिळुन आलेला अवैध माल कोठुन आणला व कोठे विकी करणार होते याचा तपास चालु आहे.

- पाहिजे आरोपी करण राम साळुंके हा सराईत गुन्हेगांर असुन त्याचे विरुध्द यापुर्वी देखील महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेले खादयपदार्थ पान मसाला व तंबाखु (सुगंधित) अवैधरित्या विक्री केले बाबत व जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

- बेकायदेशिर व्यवसायामध्ये अंतरराज्य टोळी सक्रिय असण्याची शक्यता असुन सहभागी असणाऱ्या साथीदारांचा शोध घेवुन कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.
  सदरची उल्लेखनिय कारवाई वपोनि. एन.बी.कोल्हटकर, सपोनि विजय चव्हाण, पोउपनि नितीन मुदगुन, पोउपनि धनराज केदार, पोउनि/शेखर तायडे, पोलीस अमंलदार सांगळे, कोडी, सुभे, तरकशे, पवार, दळवी, भोसले, जगदाळे, फुलकर, म्हात्रे, कुंभार,सोनावणे, सानप, पवार, कोळी, म्हसकर यांनी केली आहे.
  गुन्हयाचा पुढील तपास व.पो.नि.एन.बी. कोल्हटकर हे करीत आहेत.